बृहन्मुंबई महानगरपालिका
Brihanmumbai Municipal Corporation

सिग्नल शाळा
समर्थ भारत व्यासपीठाचा उपक्रम

# चेंबूर सिग्नल शाळा कार्य अहवाल जानेवारी 2026





# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## सर्वे वस्ती भेट



गेल्या काही महिन्यात मानखुर्द, चेंबूर व घाटकोपर येथील सिग्नलवर, फुटपाथवर व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचे संस्थेच्या प्रतिनिधींनी सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणादरम्यान अमर महल, चेंबूर परिसरात शाळाबाह्य मुलांची संख्या लक्षणीय आढळून आलेली आहे.



या सर्वेक्षणासाठी आदिवासी पारधी महासंघाचे अध्यक्ष संतोष पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मानखुर्द येथील वस्तीत शाळाबाह्य मुलांच्या पालकांना एकत्रित करून सभा घेण्यात आली. या चर्चेदरम्यान, तेथील कुटुंबांची भेट घेऊन मुलांची शैक्षणिक स्थिती समजून घेतली. दिवसभर रस्त्यावर भटकणे, भीक मागणे या गोष्टींना आळा घालण्याची पालकांची संमती दिसली.



मुलांना शाळेत पाठवण्याची पालकांची इच्छा दिसली. या पार्श्वभूमीवर, मुंबई महानगरपालिका नियोजन विभाग, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या पुढाकाराने चेंबूर, अमर महल पुलाखाली सिग्नल शाळा, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून सुरु करण्यात आली.







# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## शाळा पूर्व तयारी पालिका स्तरावर

SCLRFlyover (Santacruz–Chembur Link Road) पुलाखालील जागेत सिग्नल शाळा सुरु करण्यात आली. बृहन्मुंबई पालिकेच्या वतीने भौतिकदृष्ट्या प्राथमिक स्तरावर शाळा व्यवस्थितरित्या उभी करण्यात आली. मुला-मुलींचे स्वतंत्र स्वच्छतागृह, खेळाचे मैदान, पिण्याचे पाणी, हवेशीर वर्गखोल्या इ. सुसज्ज सोयीसुविधा सिग्नल शाळेला देण्यात आल्या.









# चेंबूर सिग्नल शाळा

## कार्य अहवाल जानेवारी 2026

## शाळा पूर्व तयारी

### शिक्षक स्तरावर

भौतिक सुविधांनी सुसज्ज असलेली शाळा सुरू करण्यापूर्वी ती शैक्षणिकदृष्ट्याही पूर्णपणे तयार असणे अत्यंत आवश्यक होते. इमारत, वर्गखोल्या व भौतिक सोयी उपलब्ध असणे पुरेसे नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक संसाधने, अध्यापन साहित्य व प्रेरक वातावरण निर्माण करणे गरजेचे होते. यासाठी ठाणे व नेरूळ येथील शिक्षकांनी अत्यंत मेहनतीने, नियोजनपूर्वक शाळेची सजावट व शैक्षणिक तयारी केली. विद्यार्थ्यांच्या वय, स्तर व गरजांचा विचार करून स्वहस्ते शैक्षणिक साहित्य तयार करण्यात आले. हे साहित्य केवळ देखाव्यासाठी नसून अध्यापनात प्रत्यक्ष वापरता येईल असे, अभ्यासक्रमाशी सुसंगत व विद्यार्थ्यांना सक्रिय सहभागी करणारे बनविण्यात आले.








# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## शाळा पूर्व तयारी

### शिक्षक स्तरावर

पूर्व प्राथमिक वर्गांसाठी लेखन-वाचन पूर्व तयारीसाठी साधने, रंगीबेरंगी चार्ट, अक्षर-चित्र ओळख, आकृत्या, खेळाधारित साहित्य; प्राथमिक वर्गांसाठी भाषा, गणित व परिसर अभ्यासाशी संबंधित तक्ते, नकाशे, प्रतिकृती तर माध्यमिक वर्गांसाठी विषयानुरूप ऐतिहासिक साहित्य, शैक्षणिक पोस्टर्स व मार्गदर्शक साहित्य अशी सुयोग्य मांडणी प्रत्येक वर्गात करण्यात आली.

तसेच, कंटेनरच्या खोलीला सुयोग्य नियोजन व कल्पकतेने वर्गखोलीचे स्वरूप देण्यात आले. भिंतींवरील शैक्षणिक मांडणी, बसण्याची व्यवस्था, फळा, अध्यापन साहित्य यामुळे त्या खोलीत खऱ्या अर्थाने शैक्षणिक वातावरणाची निर्मिती झाली. या सर्व प्रयत्नांमुळे शाळा सुरू होण्यापूर्वीच ती विद्यार्थ्यांसाठी स्वागतार्ह, प्रेरणादायी व शिकण्यास पोषक अशी तयार झाली. शिक्षकांच्या मेहनतीतून निर्माण झालेले हे शैक्षणिक वातावरण विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला गुणात्मक पातळीवर नेणारे ठरेल.







# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## विद्यार्थी - पालक भेट

### पालकांची शाळा भेट

दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी मुंबईत नव्याने सुरु झालेल्या अमर महल येथील शाळेत एक खास दिवस होता, जेव्हा पालक व विद्यार्थी यांनी शाळेला भेट दिली. ही भेट फक्त औपचारिकता नव्हती, तर पालकांना आपल्या मुलांच्या शिक्षणाचे वातावरण प्रत्यक्ष अनुभवता यावे, असा हेतू होता. शाळेच्या कंटेनरमधील शैक्षणिक वातावरण पाहून पालक खूपच भारावून गेले. प्रत्येक खोलीत विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी पोषक साहित्य, दृश्य माध्यमे, आकर्षक मांडणी यांचा उत्तम समावेश केला होता.













# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## विद्यार्थी - पालक भेट
### पालकांची शाळा भेट

शाळेला भेट देण्यापूर्वी शिक्षण आणि ज्ञानाचे महर्षी स्वामी विवेकानंद, सावित्रीबाई फुले व सरस्वतीच्या प्रतीमेला मानवंदना देण्यात आली. पालकांनी संगणक खोली, रोबोटीक खोली, मुलांमुलींचे स्वतंत्र स्वच्छतागृह, खेळाचे मैदान व खेळाचे साहित्य, प्रोजेक्टर व इतर शिक्षण-संसाधने पाहिली. या सर्व सुविधांनी पालकांचे शाळेविषयी मत अत्यंत सकारात्मक झाले.

संपूर्ण शाळेची भेट पूर्ण झाल्यानंतर संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भटू सावंत यांनी पालकांशी संवाद साधला. त्यांनी पालकांना समजावून सांगितले की, मुलांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेणे किती महत्त्वाचे आहे, तसेच शाळेतील संसाधने, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शैक्षणिक वातावरण याचा मुलांच्या सर्वांगीण विकासावर किती सकारात्मक परिणाम होतो, हे स्पष्ट केले.








# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## मुलांचे स्वागत
## पहिलं पाऊल

शाळेत आलेल्या दिवशी मुलांसाठी संपूर्ण स्वागताचे वातावरण तयार करण्यात आले. मुलांचे प्रथम कपडे बदलण्यात आले. प्रत्येक मुलाला शाळेचा गणवेश देण्यात आला, ज्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर हसू आणि उत्साह झळकू लागले. गणवेशातील मुले पाहून पालकही आनंदित झाले.



वर्गात प्रवेश देताना प्रत्येक मुलाचे पहिल्या पावलाचे ठसे लाल रंगाने टिपले गेले. वर्गाच्या दर्शनी भागात ते सुंदररीत्या लावण्यात आले. या ठशांना पाहून पालकांचे मन भारावून गेले, कारण त्यांनी प्रत्यक्ष पाहिले की शिक्षकांनी मुलांचे स्वागत किती मनापासून व उत्साहपूर्वक केले गेले आहे. मुलांनाही वर्गात पाऊल ठेवताना अशा खास स्वागताची पद्धत फार आवडली आणि त्यांचा उत्साह वाढला.



शाळेत प्रवेश केल्यानंतर, मुलांना शाळेच्या मैदानात विविध खेळण्यांवर खेळण्याचा आनंद अनुभवता आला. झुला, चेंडू खेळ, तसेच लहान गटांमध्ये खेळ खेळताना मुलांना मुक्त वातावरणात आनंद मिळाला. या खेळीमेळीच्या वातावरणामुळे मुलांमध्ये शाळेविषयी भीती निर्माण न होता विश्वासाची भावना निर्माण झाली. एकूणच, हा दिवस मुलांसाठी स्नेहपूर्ण, आनंददायी व संस्मरणीय ठरला. गणवेश, लाल पावलांचे ठसे, वर्गातील स्वागत व मैदानातील खेळ यांच्या माध्यमातून मुलांना शाळेत सकारात्मक व प्रेरक अनुभव मिळाला, तर पालकही त्यांच्या मुलांच्या आनंदित व उत्साही सुरुवातीवर अत्यंत खूश झाले.










## चांगल्या सवयी

नव्या उत्साहाने शाळेत पाऊल टाकल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, नीटनेटकेपणा आणि चांगल्या सवयी बिंबवण्याच्या उद्देशाने सिग्नल शाळेत परंपरेप्रमाणे केस व नखे कापण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांचे केस व नखे कापण्यात आली. शाळेजवळील न्हाव्याला शाळेत बोलावून मुलांचे केस नीटनेटके आणि बारीक कापण्यात आले.

सुरुवातीला काही मुले केस कापण्यास नाखूष होती. त्यांना भीती वाटत होती की आपण कसे दिसू ? मात्र केस कापल्यानंतर जेव्हा त्यांनी आरशात स्वतःकडे पाहिले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आनंदाचे हसू उमटले. स्वच्छ, टापटीप दिसण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. एकमेकांकडे पाहून मुले हसत होती.

याच वेळी शाळेतल्या ताईने मुलांची वाढलेली नखेही कापण्यात आली. नखे आणि केस स्वच्छ न ठेवल्यास होणारे दुष्परिणाम मुलांना सोप्या शब्दांत समजावून सांगण्यात आले. वाढलेल्या नखांमुळे जंतुसंसर्ग, आजारपण तसेच अस्वच्छता कशी वाढते, हे उदाहरणांसह सांगण्यात आले. तसेच अस्ताव्यस्त केसांमुळे उवा होणे, घाम साचणे आणि आरोग्यावर होणारे परिणाम यांची माहिती देण्यात आली. परिणामी, मुलांना स्वच्छतेचे महत्त्व समजले. स्वतःची काळजी घेणे, नीटनेटके राहणे आणि शिस्त पाळणे या चांगल्या सवयी त्यांच्या मनावर बिंबवल्या गेल्या.

**Nail Trimming**




**Nail Trimming**









# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## पूर्व प्राथमिक



सामान्यतः तीन वर्षांचे वय पूर्ण झाल्यानंतर मुलांना अंगणवाडी, छोटा शिशु किंवा इतर पूर्व-प्राथमिक वर्गांमध्ये दाखल केले जाते. हा काळ मुलांच्या शारीरिक, बौद्धिक, भावनिक तसेच सामाजिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. विशेषतः ३ ते ६ वर्षांचा वयोगट हा मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वाधिक पोषक मानला जातो. या वयात मुलांची निरीक्षणशक्ती, कल्पनाशक्ती, स्मरणशक्ती तसेच शिकण्याची तयारी वेगाने विकसित होत असते.

मात्र सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उदासिनता, पालकांचे अल्पशिक्षण, स्थलांतर या कारणांमुळे अनेक पालक आपल्या मुलांना या वयात शाळेत किंवा अंगणवाडीत पाठवत नाहीत. परिणामी, मुलांचे वय वाढत जाते; पण त्यांच्यात अपेक्षित शैक्षणिक व भाषिक क्षमता विकसित होत नाहीत. म्हणूनच अशा मुलांची योग्य दिशेने लेखन-वाचनाची पूर्वतयारी करून घेणे अत्यंत आवश्यक ठरते. लेखनासाठी आवश्यक असलेली बोटांची पकड, हात-डोळा समन्वय आणि सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे गरजेचे असते. यासाठी वाळूत बोटांनी रेघोट्या काढणे, विविध आकार काढणे, मणी ओवणे, रंग भरणे अशा कृती उपयुक्त ठरतात. या क्रियांच्या माध्यमातून मुलांच्या हातांच्या बोटांना सवय लागते व त्यांची लेखनासाठीची क्षमता हळूहळू वाढते.

त्याचप्रमाणे भाषिक विकासासाठी शब्दसंपत्ती वाढविणे आवश्यक असते. यासाठी मुलांकडून चित्रवर्णन करून घेणे, गोष्टी सांगणे, प्रश्न-उत्तरांच्या माध्यमातून संवाद साधणे, गाणी व कविता म्हणायला लावणे अशा उपक्रमांचा उपयोग केला जातो. या क्रियांमुळे मुलांची बोलण्याची भीती कमी होते, आत्मविश्वास वाढतो. या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून शाळेत न गेल्यामुळे मुलांचे झालेले शैक्षणिक नुकसान काही अंशी भरून काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. सिग्नल शाळेच्या माध्यमातून मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे












# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## प्राथमिक

सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उदासिनता, पालकांचे अल्पशिक्षण तसेच रोजगारासाठी होणारे स्थलांतर या विविध कारणांमुळे अनेक पालक आपल्या मुलांना योग्य वयात शाळेत किंवा अंगणवाडीत पाठवू शकत नाहीत. काही वेळा शिक्षणाचे महत्त्व लक्षात न येणे, दैनंदिन उपजीविकेच्या अडचणी, तर कधी स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण खंडित होणे अशी परिस्थिती निर्माण होते. परिणामी, मुलांचे वय वाढत जाते; मात्र त्यांच्यात अपेक्षित शैक्षणिक, बौद्धिक व भाषिक क्षमता विकसित होत नाहीत. अशा मुलांना जेव्हा सुरुवातीला प्राथमिक वर्गात प्रवेश दिला जातो, तेव्हा त्यांच्या वयाच्या तुलनेत लेखन, वाचन, अक्षरओळख, शब्दज्ञान आणि मूलभूत गणितीय संकल्पना या कौशल्यांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे शालेय अभ्यासक्रम समजून घेणे त्यांना कठीण जाते आणि शिकण्याची गती मंदावते. याचा परिणाम मुलांच्या आत्मविश्वासावरही होतो. मोठ्या वयाच्या मुलांना लहान मुलांसोबत शिकताना न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता असते.









# चेंबूर सिग्नल शाळा
# कार्य अहवाल जानेवारी 2026

## प्राथमिक

ही अडचण लक्षात घेऊन शिक्षण अधिक सोपे, रंजक व प्रभावी करण्यासाठी दृकश्राव्य साधनांचा, विशेषतः प्रोजेक्टरचा वापर करण्यात येतो. चित्रे, ध्वनी, व्हिडिओ व अॅनिमेशन यांच्या माध्यमातून अक्षरओळख, शब्दवाचन व वाक्यरचना शिकवली जात आहे. अशा पद्धतीमुळे मुलांचे लक्ष केंद्रित राहते आणि शिकणे सहज व आनंददायी होते. तसेच विविध भाषिक, गणितीय व भौगोलिक खेळ, कृतीआधारित उपक्रम, गाणी, गोष्टी व प्रश्नोत्तरे यांचा वापर करून शिक्षण दिले जात आहे. या खेळांमुळे मुलांमध्ये शिकण्याची गोडी निर्माण होते. या सर्व उपक्रमांचा महत्त्वाचा फायदा म्हणजे मोठ्या वयाच्या मुलांमध्ये “आपण शैक्षणिकदृष्ट्या मागे आहोत” अशी भावना निर्माण होत नाही. उलट, सकारात्मक वातावरणात, समवयस्कांप्रमाणेच तेही शिकू शकतात असा आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण होतो. हळूहळू त्यांची शैक्षणिक पातळी सुधारेल आणि ते मुख्य प्रवाहातील शिक्षणात सामील होण्यासाठी सक्षम बनतील.













## माध्यमिक

सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उदासिनता, पालकांचे अल्पशिक्षण तसेच रोजगारासाठी होणारे स्थलांतर या विविध कारणांमुळे अनेक पालक आपल्या मुलांना योग्य वयात शाळेत किंवा अंगणवाडीत पाठवू शकत नाहीत. काही वेळा शिक्षणाचे महत्त्व लक्षात न येणे, दैनंदिन उपजीविकेच्या अडचणी, तर कधी स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण खंडित होणे अशी परिस्थिती निर्माण होते. परिणामी, मुलांचे वय वाढत जाते; मात्र त्यांच्यात अपेक्षित शैक्षणिक, बौद्धिक व भाषिक क्षमता विकसित होत नाहीत. अशा मुलांना जेव्हा सुरुवातीला प्राथमिक वर्गात प्रवेश दिला जातो, तेव्हा त्यांच्या वयाच्या तुलनेत लेखन, वाचन, अक्षरओळख, शब्दज्ञान आणि मूलभूत गणितीय संकल्पना या कौशल्यांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे शालेय अभ्यासक्रम समजून घेणे त्यांना कठीण जाते आणि शिकण्याची गती मंदावते. याचा परिणाम मुलांच्या आत्मविश्वासावरही होतो. मोठ्या वयाच्या मुलांना लहान मुलांसोबत शिकताना न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता असते.










## माध्यमिक



ही अडचण लक्षात घेऊन शिक्षण अधिक सोपे, रंजक व प्रभावी करण्यासाठी दृकश्राव्य साधनांचा, विशेषतः प्रोजेक्टरचा वापर करण्यात येतो. चित्रे, ध्वनी, व्हिडिओ व अॅनिमेशन यांच्या माध्यमातून अक्षरओळख, शब्दवाचन व वाक्यरचना शिकवली जात आहे. अशा पद्धतीमुळे मुलांचे लक्ष केंद्रित राहते आणि शिकणे सहज व आनंददायी होते. तसेच विविध भाषिक, गणितीय व भौगोलिक खेळ, कृतीआधारित उपक्रम, गाणी, गोष्टी व प्रश्नोत्तरे यांचा वापर करून शिक्षण दिले जात आहे. या खेळांमुळे मुलांमध्ये शिकण्याची गोडी निर्माण होते. या सर्व उपक्रमांचा महत्त्वाचा फायदा म्हणजे मोठ्या वयाच्या मुलांमध्ये “आपण शैक्षणिकदृष्ट्या मागे आहोत” अशी भावना निर्माण होत नाही. उलट, सकारात्मक वातावरणात, समवयस्कांप्रमाणेच तेही शिकू शकतात असा आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण होतो. हळूहळू त्यांची शैक्षणिक पातळी सुधारेल आणि ते मुख्य प्रवाहातील शिक्षणात सामील होण्यासाठी सक्षम बनतील









## जेवण



मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी संतुलित व पौष्टिक आहार अत्यंत आवश्यक असतो. भात, पोळी, भाजी, डाळ, उसळ, हिरव्या पालेभाजी यांसारखे अन्नघटक असलेले जेवण मुलांना नियमितपणे दिले जाते. अशा आहारामुळे मुलांना आवश्यक असलेली जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने व ऊर्जा मिळते. याचा परिणाम त्यांच्या शारीरिक वाढीवर होतो तसेच त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास होतो. जेवणाच्या आधी "वदनी कवळ घेता" ही प्रार्थना म्हणण्याची सवय मुलांमध्ये निर्माण केली जात आहे. या प्रार्थनेमुळे मुलांमध्ये कृतज्ञतेची भावना निर्माण होते व अन्नाचे महत्त्व कळते. तसेच एकाग्रता, शिस्त आणि संस्कारांचे बीज त्यांच्या मनावर रुजते. शांत मनाने प्रार्थना केल्यानंतर जेवण केल्यास पचनक्रिया सुधारणेसही मदत होते.

पौष्टिक आहारामुळे मुलांचा केवळ शारीरिकच नव्हे तर बौद्धिक व मानसिक विकासही योग्य प्रकारे होतो. मेंदूच्या विकासासाठी आवश्यक पोषक घटक मिळाल्यामुळे स्मरणशक्ती, एकाग्रता व शिकण्याची क्षमता वाढते. त्यामुळे मुले अभ्यासात अधिक लक्ष केंद्रित करू शकतात आणि आत्मविश्वासाने वागू लागतात





# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## बस सर्व्हीस

मुलांच्या नियमित उपस्थितीसाठी तसेच त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळेमार्फत ने-आण करण्यासाठी बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. दररोज सकाळी बस निश्चित वेळेनुसार घाटकोपर, मानखूर्द परिसरात जाऊन मुलांना शाळेत घेऊन येते. त्यामुळे दूर अंतर, वाहतुकीची अडचण या समस्या शालेय पातळीवर येत नाहीत. शाळा सुटल्यानंतर संध्याकाळी बसद्वारे मुलांना त्यांच्या आपापल्या पालकांकडे किंवा निश्चित ठिकाणी सुरक्षितपणे सोडण्यात येते. यामुळे पालकांना मुलांच्या ये-जा बाबत खात्री व मानसिक समाधान मिळते. बसची सुविधा उपलब्ध असल्यामुळे पालकांचा शाळेवरील विश्वास वाढतो आणि ते आपल्या मुलांना नियमितपणे शाळेत पाठवण्यास प्रोत्साहित होतात. मुलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. यासाठी बसमध्ये सदैव महिला शिक्षिका कर्मचारी उपस्थित असतात. त्या मुलांवर लक्ष ठेवतात, बसमध्ये शिस्त राखतात तसेच लहान वयाच्या मुलांना बसमध्ये चढताना व उतरताना आवश्यक ते मार्गदर्शन व मदत करतात. या बस सुविधेमुळे मुलांना सुरक्षित, सोयीस्कर व वेळेवर शाळेत येणे-जाणे शक्य होत आहे. परिणामी मुलांची उपस्थिती नियमित टिकून राहते











# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## प्रजासत्ताक दिन

७७ वा अमृत महोत्सवी प्रजासत्ताक आणि मुंबईतील शाळाबाह्य मुलांनी साक्षरतेच्या दिशेनं घेतलेल पहिलं पाऊल या द्वीगुणीत आनंदात प्रजासत्ताकाचा सोहळा सिग्नल शाळेच्या तीन्ही प्रांगणात पार पडला. संविधानाच्या अंमलबजावणीचे महत्त्व समजून घेत विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक सोहळा साजरा केला. यंदाचे वेगळेपण म्हणजे मुंबईतील अमर महल, चेंबूर इथे शाळाबाह्य मुलांना मुख्य धारेत आणण्यासाठी सिग्नल शाळा सुरूझाली आहे.



मा. सुषम सावंत, नगरसेवक वार्ड क्र. १४९, प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होते. तर समर्थ भारत व्यासपीठ संस्थेचे संचालक श्री. निखील सुळे व इतर मान्यवर उपस्थित होते.





पाहुण्यांच्या हस्ते भारतमाता पूजन व तिरंग्याला मानवंदना देण्यात आली. मुलांनी शिस्तबद्ध परेड सादर करत झेंड्याला सलामी दिली. त्यांची आत्मविश्वासपूर्ण चाल, एकसंध पावलांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या परेडमुळे मुलांमध्ये शिस्त, देशप्रेम आणि संघभावना निर्माण होत आहे हे जाणवले. या सोहळ्याला सिग्नल शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचीही उपस्थिती होती. फॅब्रिकेश, वेल्डींग, शिक्षण, इलेक्ट्रीशियन अशा विविध क्षेत्रांत प्रगती करत असलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून आपल्या शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या उपस्थितीमुळे सध्याच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. यावेळी नगरसेवक सुषम सावंत तसेच इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी मुलांच्या प्रगतीचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक व जीवनातील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



# चेंबूर सिग्नल शाळा
# कार्य अहवाल जानेवारी 2026

## प्रजासत्ताक दिन









# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## प्रशासकीय शिक्षण अधिकारी भेट

बृहन्मुंबई पालिका पुरस्कृत व समर्थ भारत व्यासपीठ संचलित सिग्नल शाळा मुंबईतील SCLR फ्लायओव्हर (सांताक्रूझ–चेंबूर लिंक रोड) पुलाखालील मोकळ्या जागेत सुरू करण्यात आली आहे. बृहन्मुंबई पालिका शिक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी सौ. संगीता डोईफोडे (AO) यांनी सिग्नल शाळेला सदिच्छा भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी शाळेचे दैनंदिन कामकाज कसे चालते, अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांची उपस्थिती व त्यांची प्रगती याबाबत सविस्तर माहिती घेतली. त्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला, त्यांच्या अभ्यासाविषयी प्रश्न विचारले तसेच त्यांना प्रोत्साहन दिले.

विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची ओढ, आत्मविश्वास व उत्साह पाहून सौ. डोईफोडे यांनी समाधान व्यक्त केले. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी घेत असलेले परिश्रम पाहून त्यांना विशेष आनंद झाला. सिग्नल शाळा रस्त्यावर राहणाऱ्या तसेच वंचित घटकांतील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने कार्यरत आहे. तसेच ही समाजातील दुर्लक्षित मुलांसाठी आशेचा किरण ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.








# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## त्सू ची फाउंडेशन, तैवान प्रतिनीधी भेट

तैवानस्थित त्सू ची फाउंडेशन यांच्या सात सदस्यांच्या शिष्टमंडळाने सिग्नल शाळेला सदिच्छा भेट दिली. या शिष्टमंडळाच्या भेटीचा मुख्य उद्देश मुलांकरिता, मुलींसाठी तसेच वंचित व दुर्बल कुटुंबांसाठी कार्य करणाऱ्या स्थानिक स्वयंसेवी संस्थांना भेट देऊन त्यांच्या कार्यपद्धतीची माहिती घेणे व परस्पर संवाद साधणे हा होता. त्सू ची फाउंडेशन ही संस्था मानवी मूल्ये, करुणा, सेवा भावना, आपत्ती निवारण, आरोग्यसेवा तसेच शिक्षण या क्षेत्रांमध्ये जागतिक स्तरावर उल्लेखनीय कार्य करत असून मानवतेच्या सेवेसाठी समर्पित आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी ही संस्था विविध देशांमध्ये कार्यरत आहे.

या भेटीप्रसंगी त्सू ची फाउंडेशनचे खालील प्रतिनिधी उपस्थित होते:
1. Mr. Chen, Wan Fu 2. Mr. Hsieh, Hui Yi 3. Mr. Hsiao, Yi Chen 4. Ms. Lo, Shu Pao 5. Mr. Lu, Hsueh Chieh 6. Ms Huang, Hui ling 7. Ms. Chiu, Yu Feng









# चेंबूर सिग्नल शाळा

# कार्य अहवाल जानेवारी 2026

## त्सू ची फाउंडेशन, तैवान प्रतिनीधी भेट

या कार्यक्रमादरम्यान समर्थ भारत व्यासपीठ संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संस्थेची स्थापना, उद्दिष्टे तसेच सध्या राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व शैक्षणिक प्रकल्पांविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच सिग्नल शाळेच्या कार्यपद्धती, शाळेचे व्यवस्थापन, शिक्षणपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती शिष्टमंडळास देण्यात आली. यावेळी सिग्नल शाळेत शिकणाऱ्या मुलांच्या कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक अडचणींचा सखोल आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या जीवनातील आव्हाने, त्यांच्या शिक्षणातील अडथळे तसेच भविष्यातील गरजा समजून घेण्याचा प्रयत्न त्सू ची फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी केला. या भेटीमुळे दोन्ही संस्थांमध्ये आपुलकीचे व सकारात्मक संवाद निर्माण झाला













## स्थानिक नगरसेवक भेट

स्थानिक नगरसेवक सुषम सावंत, वार्ड क्र.१४९ यांनी सिग्नल शाळेस सदिच्छा भेट दिली. यावेळी सिग्नल शाळेत शिकणाऱ्या मुलांच्या कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक अडचणींची त्यांन समजून घेतल्या. विद्यार्थ्यांच्या जीवनातील आव्हाने, त्यांच्या शिक्षणातील अडथळे तसेच भविष्यातील गरजा जाणून आवश्यकतेप्रमाणे सकारात्मक सहकार्याची भूमिका त्यांनी दर्शविली.

